**त्रिमुर्ती शिक्षण संस्थेचे,श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय,साक्री जि.धुळे**

**राष्ट्रीय सेवा योजना**

---

**प्रा. डॉ. शरद सोनवणे** - कार्यक्रम अधिकारी

**प्रा. डॉ. जहागिरदार साळुंखे** - सहाय्यक कार्यक्रम अधिकारी

**प्रा. डॉ. करूना अहिरे** - महिला कार्यक्रम अधिकारी

---

**राष्ट्रीय सेवा योजना**

**नियमित कार्यक्रम वार्षिक अहवाल**

**(शैक्षणिक वर्ष 2021-22)**

**रासेयो एककाचे नाव : श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री जि.धुळे**

---

**1. शिवस्वराज्य दिन कार्यक्रम दि. 6 जुन 2021**

साक्री जि. धुळे येथील श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला कै.डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयात दि.6.6.2021 रोजी सकाळी 10:00 वाजता महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार शिवराज्याभिषेक दिवस शिवस्वराज्य दिन म्हणून आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस. सोनवणे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. तसेच याप्रसंगी महाराष्ट्र गीत व राष्ट्रगीत गायन झाले. यावेळी प्रा.डॉ. विजय देसले यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्य संबंधी सविस्तर मार्गदर्शन केले. तर प्राचार्य डॉ.पी.एस. सोनवणे यांनी अध्यक्षीय समारोप केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. जहागीरदार साळुंके यांनी केले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. तर महाविद्यालयाचे विद्यार्थी ऑनलाइन पद्धतीने या कार्यक्रमात सहभागी झाले होते. या कार्यक्रमाच्या यशस्वितसाठी महावितरणच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने परिश्रम घेतले. महाविद्यालयातील कार्यक्रम आटोपल्यानंतर महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी महाराष्ट्र शासनाद्वारे 11:00 am वाजता ऑनलाइन प्रक्षेपित होणाऱ्या शिवस्वराज्य दिन कार्यक्रमास दिलेल्या युट्युब लिंकद्वारे सहभागी झाले.

**2. आंतरराष्ट्रीय योग दिवस दि. 21 जुन 2021**

दि. 21 जून 2021 रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस निमित्ताने महाविद्यालयात पहाटे 6:00 ते 7:30 am या वेळेत योग शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एस. सोनवणे तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी कोरोना प्रादुर्भाव टाळण्या संबंधीचे सर्व नियम पाळून हजर होते. तर

महाविद्यालयातील विद्यार्थी ऑनलाइन पद्धतीने या शिबिरास सहभागी झाले होते. या योग शिबिरामध्ये महाविद्यालयातील ज्येष्ठ शिक्षकेतर कर्मचारी श्री छोटू रविंद्र सोनवणे यांनी प्रमुख मार्गदर्शनपर योगासने व प्राणायाम यांची प्रात्यक्षिके करून दाखवत त्याचे फायदे व तोटे विशद केले.

**3. वृक्ष बीजारोपण कार्यक्रम-1 दि. 1 जुलै 2021**

राष्ट्रीय सेवा योजना एकक व महाविद्यालयातील भूगोल आणि पर्यावरण विभाग तसेच मालपुर येथील निसर्ग मित्र समिती अंतर्गत दि. 1 जुलै 2021 रोजी मालपुर ग्रामपंचायत अंतर्गत रामनगर वस्तीस (भिल्ल आदिवासी वस्ती) लागून असलेल्या डोंगरावर बीजारोपण करण्यात आले. या उपक्रमामध्ये महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या माजी स्वयंसेवकांनी प्रमुख सहभाग नोंदवला.

**4. वृक्ष बीजारोपण कार्यक्रम-2 दि. 5 जुलै 2021**

राष्ट्रीय सेवा योजना एकक व महाविद्यालयातील भूगोल आणि पर्यावरण विभाग तसेच मालपुर येथील निसर्ग मित्र समिती अंतर्गत दि. 5 जुलै 2021 रोजी मालपुर ग्रामपंचायत अंतर्गत रामनगर वस्तीस (भिल्ल आदिवासी वस्ती) लागून असलेल्या डोंगरावर बीजारोपण करण्यात आले. या उपक्रमामध्ये महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या माजी स्वयंसेवकांनी प्रमुख सहभाग नोंदवला.

**5. वृक्ष बीजारोपण कार्यक्रम-3 दि. 24 जुलै 2021**

राष्ट्रीय सेवा योजना एकक अंतर्गत दि. 24 जुलै 2021 रोजी मालपुर ग्रामपंचायत अंतर्गत रामनगर वस्तीस (भिल्ल आदिवासी वस्ती) लागून असलेल्या डोंगरावर व परिसरात महाविद्यालयाचे माजी व प्रथम प्राचार्य दादासो शरद भामरे यांच्या जयंतीनिमित्त तसेच वृक्षलागवड सप्ताहानिमित्त वटवृक्ष आणि अन्य वृक्षांची लागवड करण्यात आली. या वृक्ष लागवड कार्यक्रमास त्रिमूर्ती शिक्षण संस्थेचे सचिव मा. डॉ. मंगलाताई देसले या उपस्थित होत्या. यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

**6. भास्करीय सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा दि. 5 ऑगस्ट 2021**

त्रिमूर्ती शिक्षण संस्थेचे, संस्थापक-अध्यक्ष कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले यांची जयंती (दि.5 ऑगस्ट 2021) निमित्त साक्री जि.धुळे येथील श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने खुली ऑनलाइन भास्करीय सामान्य ज्ञान परीक्षा आयोजित करण्यात आली. ऑनलाइन परीक्षा देण्यासाठी खाली दिलेली गुगल फॉर्म लिंक उपलब्ध करून देण्यात आली होती.

**परीक्षा देण्यासाठी लिंक - <u>https://forms.gle/7E5Hq9dhwW8iY2t77</u>**

या परीक्षेत सहभागी होणाऱ्या प्रत्येकाला ई-प्रमाणपत्र देण्यात आले.

**7. स्वच्छता पंधरवडा (दि.6 ऑगस्ट 2021)**

त्रिमूर्ती शिक्षण संस्थेचे, श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री येथे राष्ट्रीय सेवा योजना एकक अंतर्गत स्वच्छता पंधरवडा (दि.1 ऑगस्ट ते 15 ऑगस्ट 2021) निमित्त आज दि. 6 ऑगस्ट 2021 रोजी महाविद्यालय परिसरात स्वच्छता व साफसफाई करताना राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक - विद्यार्थी आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी.

**8. आदिवासी गौरव दिन दि. 8 ऑगस्ट 2021**

राष्ट्रीय सेवा योजना एकक व समाजशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आदिवासी गौरव दिनानिमित्त राष्ट्रीय वेबिनार आयोजित करण्यात आला. 'कोरोना महामारीचा महिलांवर झालेला परिणाम' या विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथील माझी समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. स्मिता अवचार यांचे प्रमुख व्याख्यान यावेळी झाले.

**9. कवयित्री बहिणाबाई चौधरी जयंती विद्यापीठ नामविस्तारदिन कार्यक्रम दि.11 ऑगस्ट 2021**

त्रिमूर्ती शिक्षण संस्थेचे, श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री येथे राष्ट्रीय सेवा योजना एकक अंतर्गत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या नामविस्तार दिनानिमित्त महाविद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्रिमूर्ती शिक्षण संस्थेच्या सचिव मा.डॉ.मंगलाताई भास्कर देसले यांच्या हस्ते खानदेश कन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे मा.प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या जीवन कार्याविषयी विस्तृत मार्गदर्शन केले. तसेच डॉ.वसुमती पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.शरद सोनवणे यांनी सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमास शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. तर विद्यार्थ्यांनी ऑनलाईन सहभाग नोंदवला.

**10.युवा दिन व जागतिक अवयवदान दिन कार्यक्रम दि. 13 ऑगस्ट 2021**

साक्री येथील त्रिमूर्ती शिक्षण संस्थेचे, श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एकक अंतर्गत युवा दिन व जागतिक अवयव दान दिन निमित्ताने एचआयव्ही - एड्स आणि अवयव दान याबाबत युवकांमध्ये जनजागृती होण्याच्या हेतूने ऑनलाइन वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.पी.एस.सोनवणे हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. तर प्रमुख व्याख्याते म्हणून ग्रामीण रुग्णालय साक्री येथील समुपदेशक श्री.योगेश नांद्रे हे सहभागी झाले होते. त्यांनी सहभागींना एचआयव्ही - एड्स या आजारासंबंधी जनजागृती आणि उपचार यासंबंधी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच अवयवदानाची आवश्यकता आणि प्रक्रिया याबाबतही यथोचित माहिती दिली. प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे यांनी अध्यक्षीय समारोप करताना देशातील युवकांसह सर्व नागरिकांनी अवयव दान करण्याबरोबरच मृत्यूपश्चात देहदान

करण्यासाठीही पुढे आले पाहिजे असे आवाहन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.शरद सोनवणे यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी ऑनलाइन पद्धतीने सहभागी झाले होते.

**11. फ्रीडम रन दि. 4 सप्टेंबर 2021**

श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय साक्री येथील राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत फ्रीडम रन उपक्रम राबविण्यात आला त्यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक कर्मचारी व विद्यार्थी यांनी फ्रीडम वॉक  केले.

**12.रासेयो स्थापना दिन साजरा कार्यक्रम दि. 24 सप्टेंबर 2021**

साक्री येथील श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै. डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयात 24 सप्टेंबर हा राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणात राष्ट्रीय सेवा योजना स्थापनेच्या पाठीमागचा हेतू विशद केला. राष्ट्रीय सेवा योजना ही सर्व भारतभर सुरु असलेली बहुआयामी स्वरूपाची चळवळ असून विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा, राष्ट्रीय एकात्मता, नीतिमूल्ये, सामाजिक समता आणि एकूणच विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्त्वाचा सर्वांगिन विकास घडविण्याचा प्रयत्न यामाध्यमातून केला जातो. राष्ट्र उभारण्याची शक्ती युवकांमध्ये असल्यामुळे त्यांना सुसंस्कारित करण्याचे महान कार्य राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून होत असते म्हणून विद्यार्थ्यांनी यात सहभागी होऊन राष्ट्र निर्माण कार्यामध्ये आपले योगदान देण्यासाठी सदैव तत्पर रहावे असे आवाहन त्यांनी  या कार्यक्रमात ऑनलाइन सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना केले. तसेच रासेयो स्थापना दिनानिमित्त रामनगर वस्ती (मालपुर ग्रा.पं.) या परिसरातील डोंगरावर प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमास रासेयो कार्यक्रम अधिकारी, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. तर रासेयो स्वयंसेवक विद्यार्थी ऑनलाइन पद्धतीने या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

**13.महात्मा गांधी विचार परीक्षा दि. 2 ऑक्टोबर 2021**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती (जागतिक अहिंसा दिन) निमित्त राज्यशास्त्र विभाग, महात्मा गांधी अभ्यास केंद्र आणि राष्ट्रीय सेवा योजना एकक च्या संयुक्त विद्यमाने "महात्मा गांधी विचार परीक्षा" (ऑनलाइन) (दि. 2 ऑक्टोबर 2021) आयोजित करण्यात आली. या परीक्षेत सहभाग घेणाऱ्या सर्व परीक्षार्थींना प्राप्त गुण व  ई-प्रमाणपत्र त्यांच्या रजिस्टर्ड ई-मेलवर पाठविण्यात आले. खाली दिलेल्या गुगल फॉर्म लिंकद्वारे विद्यार्थ्यांना परीक्षेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले होते.

https://forms.gle/BB2Lur8GzkiJhV6t9

या परीक्षेत एकूण 167 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

**14.महात्मा गांधी जयंती व आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन निमित्ताने ग्राम स्वच्छतेवर व्याख्यान - दि. 2 ऑक्टोबर 2021**

साक्री येथील श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै. डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना एक अंतर्गत महात्मा गांधी जयंती व आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन निमित्ताने महात्मा गांधी आणि ग्राम स्वच्छता या विषयावर प्रा.डॉ.विजय देसले यांचे व्याख्यान आयोजन करण्यात आले होते. महात्मा गांधींचा ग्राम स्वच्छतेचा विचार हा अत्यंत व्यापक स्वरूपाचा होता आणि त्यामध्ये मनाच्या व अंतःकरणाच्या स्वच्छतेचा विचार अंतर्भूत होता, असे मत डॉ. देसले यांनी प्रतिपादन केले. अध्यक्षस्थानी उपस्थित असलेले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे यांनी आपल्या भाषणात गांधी विचारांची प्रासंगिकता अधोरेखित केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.शरद सोनवणे यांनी केले. तर रासेयो सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ.जहागीरदार साळुंखे यांनी आभार प्रदर्शन केले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यावेळी उपस्थित होते. तर विद्यार्थी ऑनलाइन पद्धतीने या व्याख्यानात सहभागी झाले होते.

**15.युवा स्वास्थ्य मिशन (COVID-19 Vaccination Camp) दि. 29 ऑक्टोबर 2021**

साक्री, येथील श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयात कबचौउमवि. जळगाव आणि सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग यांच्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग पुरस्कृत 'युवा स्वास्थ्य मिशन' अंतर्गत दि.२९ ऑक्टोबर २०२१ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र, कळंभीर ता.साक्री यांच्या सहाय्याने कोविड-१९ प्रतिबंधक लसीकरण शिबिर संपन्न झाले. त्रिमूर्ती शिक्षण संस्थेच्या सचिव मा.डॉ.मंगलाताई देसले यांच्या प्रेरणेने आयोजित करण्यात आलेल्या या लसीकरण शिबिरात महाविद्यालयातील २६ विद्यार्थ्यांना कोरोना प्रतिबंधक लस देण्यात आली. यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र, कळंभीर येथील वैद्यकीय अधिकारी डॉ.आशुतोष साळुंखे, आरोग्य सेवक श्री.जी.एस.मारनर, श्री.सागर कोळी व श्रीमती प्रियंका पवार यांनी परिश्रम घेतले.

या शिबिराच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.शरद सोनवणे, विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा.दिनकर पाटील, क्रीडा संचालक प्रा.अशोक भदाणे, महिला कार्यक्रमाधिकारी डॉ.करूना अहिरे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ.जहागीरदार साळुंके तसेच महाविद्यालयातील अन्य प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मदत केली.

**16.राष्ट्रीय एकता दिवस - सरदार वल्लभभाई पटेल जयंती कार्यक्रम दि. 31 ऑक्टोबर 2021**

भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्ताने राष्ट्रीय सेवा योजना एकक अंतर्गत राष्ट्रीय एकता दिवस महाविद्यालयात साजरा करण्यात आला.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे यांच्या हस्ते सरदार वल्लभभाई पटेल यांच्या

प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यांनी यावेळी आपले मनोगत देखील व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.शरद सोनवणे यांनी केले.

**17.संविधान दिवस दि. 26 नोव्हेंबर 2021**

साक्री येथील श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना एकक अंतर्गत 26 नोव्हेंबर हा संविधान दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या त्रिमूर्ती शिक्षण संस्थेच्या सचिव मा.डॉ.मंगलाताई देसले यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना संविधान दिनाच्या शुभेच्छा देऊन सर्वांनी संविधानिक नीतिमूल्यांचे संवर्धन व त्यानुसार आचरण करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे यांनी सर्व विद्यार्थ्यांना संविधानिक प्रतिबद्धतेसंबंधी मार्गदर्शन करून सर्वांनी कोरोना प्रतिबंधक लस घेण्याचे व मतदार यादीत नावनोंदणी करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे वाचन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.शरद सोनवणे यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि 82 विद्यार्थी हजर होते

**18.डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन कार्यक्रम दि.6 डिसेंबर 2021**

राष्ट्रीय सेवा योजना एकक अंतर्गत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन निमित्ताने महाविद्यालयात कार्यक्रम आयोजित करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. पी. एस. सोनवणे यांनी डॉ. आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन केले व सर्व उपस्थितांनी या महामानवाला अभिवादन केले. यावेळी डॉ दिनेश माळी डॉ. कैलास वाघ यांनी आपले विचार मांडले. तर राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. शरद सोनवणे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले.

**19.'जागतिक मानवाधिकार दिन' कार्यक्रम दि. 10 डिसेंबर 2021**

साक्री येथील श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै. डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयाच्या राष्टीय सेवा योजना एकक अंतर्गत 10 डिसेंबर हा आंतरराष्टीय मानवी हक्क दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. दिनकर पाटील यांनी आपले विचार व्यक्त केले. मानवी हक्क म्हणजे काय?, मुलभूत मानवी हक्क कोणते आहेत त्यामध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्य , मतदान करण्याचा , निवडणूक लढवण्याचा अधिकार , शिक्षणाचा अधिकार, कायाद्यासमोर समानतेचा अधिकार, जीवनाधिकार, यातनां पासून मुक्तता, भाषण स्वातंत्र्य अशा मुलभूत हक्कांवर व्याख्यान दिले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपस्थित असलेले महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. पी. एस. सोनवणे यांनी अध्यक्षीय भाषणात आपले विचार मांडले. जगभरातील लोकांना मानवाधिकाराकडे आकर्षित करण्यासाठी संयुक्त राष्टसंघाने १९५० मध्ये 10 डिसेंबर हा मानव अधिकार दिवस म्हणून घोषित केला, भारतात २८ सप्टेंबर १९९३ मध्ये मानवी हक्क कायदा लागू करण्यात आला , त्यानंतर १२ ऑक्टोंबर १९९३ मध्ये राष्ट्रीय मानवी हक्क

आयोगाची स्थापना करण्यात आली. हा आयोग राजकीय, सामाजिक, आर्थिक, आणि सांस्कृतिक या कार्यक्षेत्रातही लागू करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. शरद सोनावणे यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. जहागीरदार साळुंके यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी आणि 78 विद्यार्थी उपस्थित होते.

**20.अल्पसंख्यांक हक्क दिवस कार्यक्रम दि. 18 डिसेंबर 2021**

राष्ट्रीय सेवा योजना एकक अंतर्गत अल्पसंख्यांक हक्क दिवस कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी एस सोनवणे हे उपस्थित होते. तर प्रमुख व्याख्याते म्हणून डॉ. कैलास वाघ यांनी यावेळी आपले विचार मांडले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन डॉ. विजय देसले यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**21.ग्राहक दिन कार्यक्रम दि.24.12.2021**

राष्ट्रीय सेवा योजना एकक आणि साक्री तालुका ग्राहक मंच यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात ग्राहक दिन निमित्ताने जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमास नायब तहसीलदार श्री गोपाळ पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते.

**22.क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रम दि. 3 जानेवारी 2022**

साक्री, येथील त्रिमूर्ती शिक्षण संस्थेचे श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एकक अंतर्गत दि. 3 जानेवारी 2022 रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे हे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सी.गो.पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.आर.अहिरे व धुळे जिल्हा रासेयो समन्वयक डॉ.सचिन नांद्रे उपस्थित होते. यावेळी विशेष मार्गदर्शक अतिथी म्हणून माजी प्राचार्य दादासाहेब बी.एस.पाटील यांची उपस्थिती लाभली. प्राचार्य डॉ.आर.आर.अहिरे यांनी यावेळी बोलताना सावित्रीबाई फुले यांनी मुलींच्या शिक्षणासाठी घेतलेल्या अपार परिश्रमाचा वृत्तांत मांडला. डॉ.सचिन नांद्रे यांनी उपस्थित विद्यार्थिनींनी विकासाच्या विविध क्षेत्रांमध्ये स्वतःचा ठसा उमटवावा असे आवाहन केले. दादासाहेब बी एस पाटील यांनीही उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सावित्रीबाई फुले यांचे विचार सतत डोळ्यासमोर ठेवून मुलींनी स्वावलंबी बनण्यासाठी कठोर परिश्रमाला तयार राहण्याचे आवाहन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी एस सोनवणे यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपाच्या भाषणात क्रांतिसूर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे विचार व कार्य आजही सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याचे नमूद केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.शरद सोनवणे यांनी केले. तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ.दिनेश माळी यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

**23.राष्ट्रीय युवा दिवस कार्यक्रम दि.12 जानेवारी 2022**

राष्ट्रीय सेवा योजना एकक अंतर्गत राष्ट्रीय युवा दिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या जयंती निमित्ताने प्रतिमापूजन व अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास श्री यशवंत शितोळे (अध्यक्ष महाराष्ट्र राज्य माहिती सहायता केंद्र) आणि डॉ. सचिन नांद्रे (रासेयो जिल्हा समन्वयक) हे मान्यवर उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी एस सोनवणे यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले तसेच मान्यवरांचे स्वागत केले.

**24.राष्ट्रीय मतदार दिवस कार्यक्रम / व्याख्यान दि.25 जानेवारी 2022**

साक्री येथील श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै. डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयाच्या इतिहास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास विभाग, गांधी तत्वज्ञान केंद्र व निवडणूक साक्षरता मंडळ यांच्या संयुक्त विद्येमाने २५ जानेवारी हा राष्ट्रीय मतदार दिवस ऑनलाईन साजार करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्री गोपाल पाटील (नायब तहसीलदार साक्री), तसेच प्राचार्यबी.एम.भामरे हे उपस्थित होते.

या कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.शरद सोनवणे यांनी आपल्या व्याख्यानात सशक्त लोकशाहीच्या दृढीकरण्यासाठी मतदारांनी संकुचित भूमिकांना व दबावांना बळी न पडता व्यापक राष्ट्रहितास प्राधान्य देऊन निष्पक्षपणे मतदानाचे पवित्र कर्तव्य बजावले पाहिजे असे प्रतिपादन केले. तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून पसरणाऱ्या फेक न्यूज अर्थात खोट्या आणि दिशाभूल करणाऱ्या माहितीपासून युवा मतदार विद्यार्थ्यांनी सावध राहून त्याची सत्यता पडल्याखेरीज त्यावर विश्वास न ठेवण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच सजग मतदार हाच सदृढ लोकशाहीचा खरा आधार असून मतदारांच्या विवेकी वर्तनावरच भारतीय लोकशाहीचे यश अवलंबून असल्याचा विचार त्यांनी आपल्या व्याख्यानात नमूद केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपस्थित असलेले महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. पी. एस. सोनवने यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना मतदार यादीत नावनोंदणी करण्यास सांगून नेहमी सचोटीने व स्वतःच्या विवेकबुद्धीने योग्य, प्रामाणिक आणि जनसेवेस कटिबद्ध असणाऱ्या चारित्र्यवान उमेदवारांनाच मतदान करण्यासाठी नेहमी आपला मतदानाचा हक्क बजावला पाहिजे असे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. विजय देसले यांनी केले. तसेच मतदारांसाठी प्रतीज्ञाचे वाचन विद्यार्थी विकास विभाग प्रमुख प्रा. दिनकर पाटील यांनी केले. या कार्यक्रमास उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला. जवळजवळ ७० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. त्यापैक्की २४ विद्यार्थ्यांनी रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, घोषवाक्य इत्यादींमध्ये सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. डॉ. विजय देसले यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. हा कार्यक्रम ऑनलाईन व ऑफलाईन या दोन्ही पद्धतीने घेण्यात आला.

(लिंक https://meet.google.com/xzx-qdue-cnu)

**25.महात्मा गांधी पुण्यतिथी (हुतात्मा दिन) दि.30 जानेवारी 2022**

राष्ट्रीय सेवा योजना गीत अंतर्गत राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची पुण्यतिथी अर्थात हुतात्मा दिन महाविद्यालयात आयोजित करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे यांनी महात्मा गांधींच्या प्रतिमेचे पूजन केले तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना अभिवादन केले. प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे यांनी महात्मा गांधीच्या जीवन कार्यावर मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. शरद सोनवणे यांनी केले.

**26.आजादी का अमृत महोत्सव निमित्ताने विशेष व्याख्यान दि.5 फेब्रुवारी 2022**

आजादी का अमृत महोत्सव निमित्ताने साक्री येथील श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयात मा. डॉ. सचिन नांद्रे (संचालक, रासेयो, कबचौउमवि. जळगाव) यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. तसेच विद्यापीठात संचालक रासेयो पदावर नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे यांच्या हस्ते महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

**27.भारतरत्न लता मंगेशकर यांना श्रद्धांजली दि. 10 फेब्रुवारी 2022**

भारतरत्न लता मंगेशकर (निधन दि.6 फेब्रुवारी 2022) यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी गुरुवार दि. 10 फेब्रुवारी 2022 रोजी सकाळी 11 वाजता रुईया महाविद्यालय माटुंगा येथे श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी ऑनलाइन सहभाग घेतला. त्यासाठी खाली दिलेली युट्युब लिंक किंवा फेसबूक लिंक फॉलो करण्यात आली.

YouTube link- https://youtube.com/channel/UCP2tI2ByPMnxnVgtsmNWYjA

Facebook link- https://www.facebook.com/udayravindrasamant/

**28.छत्रपती शिवाजी महाराज जयंती कार्यक्रम दि. 19 फेब्रुवारी 2022**

दि. 19 फेब्रुवारी 2022 रोजी राष्ट्रीय सेवा योजना एकक अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती महाविद्यालयात साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित असलेले श्री सचिन भामरे यांचे व्याख्यान झाले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी एस सोनवणे हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपस्थित होते. डॉ. शरद सोनवणे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. डॉ.अभिजित भामरे यांनी प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला. डॉ. विजय

देसले यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**29.मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रम दि. 26 फेब्रुवारी 2022**

साक्री, येथील श्रीमती विमलताई उत्तमराव पाटील कला व कै. डॉक्टर भास्कर सदाशिव व विज्ञान महाविद्यालयात दि. 26 फेब्रुवारी 2022 रोजी मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालनप्रा.डॉ..कैलास वाघ यांनी केले. तर प्रास्ताविक प्रा.डॉ..वसुमती पाटील यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी एस सोनवणे हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी मराठी कवितांचे वाचन केले. या कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**30.स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्त विशेष व्याख्यान दि.4 मार्च 2022**

साक्री, येथील श्रीमती विमलताई उत्तमराव पाटील कला व कै. डॉक्टर भास्कर सदाशिव व विज्ञान महाविद्यालयात स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव निमित्त विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील प्रो.डॉ.सुनील कुलकर्णी संचालक विद्यार्थी विकास विभाग हे या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एस. सोनवणे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयातील विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.दिनकर पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमुख पाहुण्यांचा परिचय रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. शरद सोनवणे यांनी केले. तर रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.करुणा अहिरे यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**31.जागतिक महिला दिन दि.8 मार्च 2022**

श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै. डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय साक्री येथे जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला या प्रसंगी प्रा. सौ सारिका शिंदे मॅडम योग शिक्षिका यांनी मार्गदर्शन केले तसेच अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. पी. एस .सोनवणे यांनी मनोगत व्यक्त केले.

**32.शहीद दिन कार्यक्रम दि.23 मार्च 2022**

श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै. डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय साक्री येथे दि.23 मार्च 2022 रोजी शहीद दिन कार्यक्रम आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. विजय देसले यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी एस सोनवणे हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपस्थित होते. या कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**शिवस्वराज्य दिन कार्यक्रम दि.6.6.2021**







तरुण भारत


Main Edition | 2021-06-09 | Page- 2
epaper.tarunbharatjalgaon.com


**शहर.... परिसर...**

## साक्री येथील देसले महाविद्यालयात शिव स्वराज्य दिन साजरा



**नवापूर** : श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै. डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयात शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एस. सोनावणे हे होते तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. विजय कौतिकराव देसले होते. सूत्रसंचालन प्रा. डॉ. जहागीरदार साळुंखे यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र गीताने झाली. तदनंतर प्रमुख वक्ते डॉ. विजय देसले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यात त्यांनी राज्याभिषेकाचे महत्व व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुढील राज्याभिषेकासाठी झालेल्या अडचणी याच्यावर विस्तृत विवेचन केले. त्यात त्यांनी शिवराज्याभिषेकात जगातील इंग्लंड, फ्रेंच, डच, पोर्तुगीज यांच्या उपस्थितीचा उल्लेख केला. त्यावरोबर या राज्याभिषेकाच्यावेळी भारतातील सर्व नद्यांचे जल आणण्यात आले होते. याविषयी त्यांनी विस्तृत मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. पी.एस. सोनावणे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची जगातील ख्याती आणि जगात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्थान याबद्दलचे विस्तृत विवेचन गीताच्या व पोवाड्याच्या माध्यमातून दिले. कार्यक्रमास महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



**आंतरराष्ट्रीय योग दिवस दि.21 जून 2021**







वृक्ष बीजारोपण कार्यक्रम-1 **दि.** 1 जुलै 2021

जळगाव तरुण भारत
Main Edition | 2021-07-03 | Page- 6
epaper.tarunbharatjalgaon.com

## साक्री महाविद्यालयाचा बीज बँकेसह वृक्षारोपणाचा संकल्प



**नवापूर** : येथील श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला, कै.डॉ. बी.एस. देसले विज्ञान महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने मालपुर जवळील ओसाड माळरानावरील डोंगर परिसंस्थेवर ५०० लिंबाच्या बियांचे रोपण करण्यासह रोपांचे संवर्धन करण्याचा संकल्प करण्यात आला. प्राचार्य डॉ. पी. एस. सोनवणे, प्रा. अजय नांद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली जून महिन्याच्या कालावधी ओसाड डोंगर परिसंस्थेवर साबर या काटेरी वनस्पतीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर आहे, याचा अभ्यास करून निसर्गप्रेमी विद्यार्थ्यांना मदतीस घेउन काटेरी झुडपांमध्ये पाच हजारांपेक्षा जास्त लिंबाच्या बियांचे रोपण करण्यात आले. काटेरी वनस्पतींच्या सानिध्यात असणाऱ्या रोपांचे शेळ्या-मेंढ्यांपासून सुरक्षित असल्याने वनसंवर्धनात वाढ होईल. ही प्रक्रिया एका दिवसासाठी मर्यादित न ठेवता नियमित रहावी व स्वेच्छेने बीज संकलनासह व बीजारोपण करण्याचा संकल्प विद्यार्थ्यांकडून करण्यात आला. व्हाट्सअप, फेसबुक ग्रुप करून रामफळ, सिताफळ, लिंब, चिंच, जांभूळ इत्यादी विविध प्रकारच्या बिया फेकून न देता घरोघरी संकलन करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांनी केले व त्यांनी स्वतः बीज बँक साठवण्याची जबाबदारी घेतली. सामाजिक स्तरावर या कार्याची दखल घेतली जात आहे. बीज संकलन बीजारोपणच्या प्रक्रियेत प्रा. अजय नांद्रे, माजी विद्यार्थी निनाद अहिरराव, कल्पेश शिंदे यांचेसह आदी युवक युवती सहभागी झाले.

वृक्ष बीजारोपण कार्यक्रम-2 **दि.** 5 जुलै **2021**

जळगाव तरुण भारत
Main Edition | 2021-07-08 | Page- 2
epaper.tarunbharatjalgaon.com

# साक्री महाविद्यालयाचा ऑक्सिजन पार्क निर्माण करण्याचा संकल्प

**नवापूर** : विमलबाई उत्तमराव पाटील कला कै. डॉ. बी एस देसले विज्ञान महाविद्यालयातील प्रा. अजय नांद्रे यांच्या मार्गदर्शनात महाविद्यालयातील माजी विद्यार्थी व निसर्ग मित्र समिती साक्री यांच्या संयुक्त विद्यमाने मालपुर येथील रामनगरच्या ओसाड डोंगराचे वनात रूपांतर करण्याचे स्वप्न पाहिले आहे.


सोशल मीडियाच्या माध्यमातून विविध वृक्षांच्या बियांची व रोपांची मदत मागितली जाते व अनेक पर्यावरणप्रेमी त्यांना लहान स्वरूपात मदत करायला लागले त्याचाच एक भाग म्हणून या विद्यार्थ्यांना काही झाडे एकादा त्याने दिली व त्यांनी दिनांक ५ रोजी डोंगर परिसरात समाजातील पर्यावरण प्रेमी लोकांना



बोलावून यांच्या हस्ते या वृक्षांची लागवड डोंगर पायथ्यापासून सुरुवात केली तसेच बीजारोपण याचा संकल्प त्यांनी पाऊस पडतो तो पर्यंत करण्याचे नियोजन केले त्या अनुषंगाने काटेरी झुडपांचा सानिध्यात २००० लिंबाच्या बियांची लागवड केली. यासाठी संस्थेचे सचिव डॉ. मंगलाताई देसले व प्राचार्य डॉ. पी. एस. सोनवणे यांनी प्रेरणा दिली.

महाविद्यालयाचे प्रा. अजय नांद्रे यांच्या सहकार्याने माजी विद्यार्थी मिलिंद नांद्रे, जयेश सोनवणे, कल्पेश शिंदे , निनाद अहिरराव, ऋषिकेश सोनवणे या विद्यार्थ्यांनी निसर्ग मित्र समितीच्या सदस्यांच्या माध्यमातून प्रत्यक्षपणे वृक्षारोपनाचा कार्यक्रम केला. यासाठी बीजसंकलन करण्यासाठी महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी देविदास बच्छाव, प्रशांत पवार, किसन सुर्यवशी यांनी सहकार्य केले.

भास्करीय सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा **दि.5 ऑगस्ट 2021**



**कवयित्री बहिणाबाई चौधरी जयंती विद्यापीठ नामविस्तार दिन कार्यक्रम दि.11. ऑगस्ट 2021**











तरुण भारत
Main Edition | 2021-08-12 | Page- 2
epaper.tarunbharatjalgaon.com


# विद्यापीठाच्या नामविस्तार दिनानिमित्त कार्यक्रम



**नवापूर** : विमलबाई उत्तमराव पाटील कला महाविद्यालय, साक्री येथे राष्ट्रीय सेवा योजना एकक अंतर्गत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या नामविस्तार दिनानिमित्त महाविद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सचिव डॉ.मंगलाताई देसले यांच्या हस्ते खानदेश कन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. पी.एस.सोनवणे यांनी बहिणाबाई चौधरी यांच्या जीवन कार्याविषयी मार्गदर्शन केले. रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.शरद सोनवणे यांनी सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले.

महात्मा गांधी विचार परीक्षा दि. 2 ऑक्टोबर 2021






**महात्मा गांधी जयंती व आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन निमित्ताने ग्राम स्वच्छतेवर व्याख्यान -** दि. 2 ऑक्टोबर 2021






जळगाव तरुण भारत

Main Edition | 2021-10-05 | Page- 7
epaper.tarunbharatjalgaon.com

# देसले महाविद्यालयात महात्मा गांधी जयंतीनिमित्त ग्रामस्वच्छतेवर व्याख्यान

**नवापूर :** साक्री येथील श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै. डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत महात्मा गांधी जयंती व आंतरराष्ट्रीय अहिंसा दिनानिमित्ताने महात्मा गांधी आणि ग्रामस्वच्छता या विषयावर प्रा.डॉ.विजय देसले यांचे व्याख्यान आयोजन करण्यात आले होते.

महात्मा गांधींचा ग्रामस्वच्छतेचा विचार हा अत्यंत व्यापक स्वरूपाचा होता आणि त्यामध्ये मनाच्या व अंतःकरणाच्या स्वच्छतेचा विचार अंतर्भूत होता, असे मत डॉ.देसले यांनी प्रतिपादन केले.

अध्यक्षस्थानीउपस्थित असलेले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस. सोनवणे यांनी आपल्या भाषणात गांधी विचारांची प्रासंगिकता अधोरेखित केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.शरद सोनवणे यांनी केले. रासेयो सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ.जहागीरदार साळुंखे यांनी आभार मानले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यावेळी उपस्थित होते. तर काही विद्यार्थी ऑनलाईन पद्धतीने या व्याख्यानात सहभागी झाले होते.



युवा स्वास्थ्य मिशन (COVID-19 Vaccination camp) दि. 29 ऑक्टोबर 2021






तरुण भारत जळगाव

Main Edition | 2021-10-30 | Page- 2
epaper.tarunbharatjalgaon.com

# देसले महाविद्यालयात कोरोना प्रतिबंधक लसीकरण शिबीर



**नवापूर** : साक्री येथील श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयात कबचौउमवि. जळगाव आणि सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग यांच्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग पुरस्कृत 'युवा स्वास्थ्य मिशन' अंतर्गत २९ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र, कळंभीर ता.साक्री यांच्या सहाय्याने कोविड-१९ प्रतिबंधक लसीकरण शिबिर झाले. त्रिमूर्ती शिक्षण संस्थेच्या सचिव डॉ.मंगलाताई देसले यांच्या प्रेरणेने आयोजित करण्यात आलेल्या या लसीकरण शिबिरात महाविद्यालयातील २६ विद्यार्थ्यांना कोरोना प्रतिबंधक लस देण्यात आली. यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र, कळंभीर येथील वैद्यकीय अधिकारी डॉ.आशुतोष साळुंखे, आरोग्यसेवक जी.एस.मारनर, सागर कोळी व प्रियंका पवार यांनी सहकार्य केले.

या शिबिराच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस. सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. शरद सोनवणे, विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा.दिनकर पाटील, क्रीडा संचालक प्रा.अशोक भदाणे, महिला कार्यक्रमाधिकारी डॉ.करूना अहिरे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ.जहागीरदार साळुंके तसेच महाविद्यालयातील अन्य प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मदत केली.

**Change In Name**

I have changed my name from JAY SANJAY WANI to JAYKUMAR SANJAY WANI and I will use JAYKUMAR SANJAY WANI as new name in rest of my life. This change have been made

ॲड.एस.जी.शर्मा, जळगाव
मे.जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग
जळगांव यांचे समोर
प्रशासकीय इमारतीच्या बाजूला आकाशवाणी
चौकाजवळ, जळगाव
तक्रार क्रमांक - ४१/२०१९
०१ श्रीमती रमाबाई चंपालाल उर्फ शशिकांत
कलाल (टिलकपुरे) .....तक्रारदार
//विरुद्ध//
१. श्री.सिध्दी वेंकटेश अर्बन को. ऑप क्रेडिट
सोसायटी लि. जळगाव ... सामनेवाले
पत्ता- दुकान नं. १२८-१२९ दुसरा मजला फुले

Powered by iDocuments

# देसले महाविद्यालयात लसीकरण शिबिर

सकाळ वृत्तसेवा

म्हसदी, ता. ३१ : साक्री येथील श्रीमती विमलबाई पाटील कला व (कै.) डॉ. भास्कर देसले कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास तसेच कंळबीर (ता. साक्री) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र यांचे 'युवा स्वास्थ्य मिशन युवा स्वास्थ्य' मोहिमेंतर्गत लसीकरण शिबिर झाले.

त्रिमूर्ती शिक्षण संस्थेच्या सचिव डॉ. मंगला देसले यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या लसीकरण शिबिरात २६ विद्यार्थ्यांना लस देण्यात आली. कंळबीर प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. आशुतोष साळुंखे, आरोग्यसेवक जी. एस. मारनर, सागर कोळी व प्रियंका पवार यांनी लसीकरण शिबिरात सहभाग घेतला. प्राचार्य डॉ. पी. एस. सोनवणे, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. शरद सोनवणे, विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. दिनकर पाटील, क्रीडा संचालक प्रा. अशोक भदाणे, महिला कार्यक्रमाधिकारी डॉ. करुणा अहिरे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. जहागीरदार, साळुंके आदी उपस्थित होते.

**राष्ट्रीय एकता दिवस - सरदार वल्लभभाई पटेल जयंती कार्यक्रम दि. 31 ऑक्टोबर 2021**



**संविधान दिवस दि. 26 नोव्हेंबर 2021**






जळगाव तरुण भारत
Main Edition | 2021-11-27 | Page- 2
epaper.tarunbharatjalgaon.com

## गाव शिवार वार्ता...

# देसले महाविद्यालयात संविधान दिन साजरा



**नवापूर** : साक्री येथील श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै. डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना एकक अंतर्गत २६ नोव्हेंबर हा संविधान दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या त्रिमुर्ती शिक्षण संस्थेच्या सचिव डॉ.मंगलाताई देसले यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना संविधान दिनाच्या शुभेच्छा देऊन सर्वांनी संविधानिक नीतिमूल्यांचे संवर्धन व त्यानुसार आचरण करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.एस.सोनवणे यांनी सर्व विद्यार्थ्यांना संविधानिक प्रतिबद्धतेसंबंधी मार्गदर्शन करून सर्वांनी कोरोना प्रतिबंधक लस घेण्याचे व मतदार यादीत नावनोंदणी करण्याचे आवाहन केले. सूत्रसंचालन व संविधानाच्या उद्देश्य पत्रिकेचे वाचन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.शरद सोनवणे यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते.

Powered by iDocuments

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन कार्यक्रम दि.6 डिसेंबर 2021**






**जागतिक मानवाधिकार दिन' कार्यक्रम दि. 10 डिसेंबर 2021**






जळगाव तरुण भारत
Main Edition | 2021-12-12 | Page- 2
epaper.tarunbharatjalgaon.com

# देसले महाविद्यालयात मानवी हक्क दिन साजरा



**नवापूर :** साक्री येथील श्रीमती वेमलबाई उत्तमराव पाटील कला । कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले वेज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय ब्रेवा योजना एकक अंतर्गत १० डिसेंबर हा आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून विद्यार्थी विकास अधिकारी ।ा. दिनकर पाटील यांनी विचार व्यक्त केले.

मानवी हक्क म्हणजे काय?, मुलभूत मानवी हक्क कोणते आहेत यामध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्य, मतदान करण्याचा, निवडणूक लढवण्याचा अधिकार , शिक्षणाचा अधिकार, कायद्यासमोर समानतेचा अधिकार, जीवनाधिकार, यातनांपासून मुक्तता, भाषण स्वातंत्र्य अशा मुलभूत हक्कांवर व्याख्यान देले.

अध्यक्षस्थानी उपस्थित असलेले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस. सोनवणे यांनी अध्यक्षीय भाषणात विचार मांडले. जगभरातील लोकांना मानवाधिकाराकडे आकर्षित करण्यासाठी संयुक्त राष्टसंघाने १९५० मध्ये १० डिसेंबर हा मानव अधिकार दिवस म्हणून घोषित केला, भारतात २८ सप्टेंबर १९९३ मध्ये मानवी हक्क कायदा लागू करण्यात आला. त्यानंतर १२ ऑक्टोंबर १९९३ मध्ये राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली. हा आयोग राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक या कार्यक्षेत्रातही लागू करण्यात आला. सूत्रसंचालन व प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.शरद सोनवणे यांनी केले. आभार डॉ.जहागीरदार साळुंके यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Powered by iDocuments

**अल्पसंख्यांक हक्क दिवस कार्यक्रम दि. 18 डिसेंबर 2021**






जळगाव तरुण भारत
Main Edition | 2021-12-19 | Page- 2
epaper.tarunbharatjalgaon.com

# साक्रीच्या देसले महाविद्यालयात अल्पसंख्यांक हक्क दिवस साजरा



**नवापूर :** साक्री येथील श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै. डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयात १८ डिसेंबर हा अल्पसंख्यांक हक्क दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाकरिता प्रमुखवक्ते म्हणून मराठी विषयाचे व्याख्याता प्रा.डॉ.के बी. वाघ हे होते. त्यांनी आपल्या मनोगतात अल्पसंख्यांक कोणआहेत त्यात पारशी, मुस्लिम, शिख, बौद्ध यांना केंद्र सरकारने एका अधिसूचना काढून १९९३ मध्ये अल्पसंख्यांक घोषित केले. याविषयी व अल्पसंख्यांक कोणाला म्हणतात याविषयी त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यात त्यांनी धार्मिक अल्पसंख्यांक व भाषिक अल्पसंख्यांक यांच्यावर विवेचन केले. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून लाभलेले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे यांनी अल्पसंख्यांकांच्या हक्कांवर राष्ट्रसंघाची भूमिका आणि अल्पसंख्यांक समाजाला मिळणाऱ्या होतकरू व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना उच्च व व्यावसायिक शिक्षण घेण्यास प्रेरित करण्यासाठी काही योजना राबविण्यात येतात, काही योजनेअंतर्गत आर्थिक मदतही मिळते त्या योजनांची माहिती अध्यक्षीय भाषणातून सांगितली. सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा.डॉ. विजय देसले यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.दिनकर पाटील यांनी केले.

Powered by iDocuments

**ग्राहक दिन कार्यक्रम दि.24.12.2021**






जळगाव
तरुण भारत
Main Edition | 2021-12-25 | Page- 2
epaper.tarunbharatjalgaon.com

# साक्री महाविद्यालयात राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा




**साक्री** : येथील विमलबाई पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे होते.

यावेळी नायब तहसीलदार गोपाळ पाटील, ग्राहक पंचायत महाराष्ट्राचे साक्री तालुकाध्यक्ष प्राचार्य बी.एम.भामरे, प्रवासी महासंघाचे तालुकाध्यक्ष सुरेश पारख, डॉ.दिलीप चोरडिया, सचिव विलास देसले, डॉ.सचिन नांद्रे, प्रणेता देसले, के.एस.बच्छाव, जोशीला पगारीया उपस्थित होते. ग्राहकांचे हक्क व कर्तव्य तसेच वस्तू खरेदी करतांना घ्यावयाची काळजी तसेच सायबर फसवणूक याविषयी विस्तृत मार्गदर्शन केले. ग्राहक दिन साजरा करतांना जनतेमध्ये जागरूकता निर्माण होण्याच्या दृष्टीने असा कार्यक्रम व्यापक होण्यासाठी ग्राहक पंचायतच्या सहकार्याने कार्यक्रमाच्या आयोजनाचा उद्देश स्पष्ट केला.

सूत्रसंचालन जिल्हा सहसंघटक पी.झेड. कुवर यांनी केले. आभार विलास देसले यांनी मानले. याप्रसंगी ग्राहक पंचायतचे डॉ.सचिन नांद्रे, प्रा.अजय नांद्रे, प्रणेता देसले, डॉ.दिलीप चोरडीया, श्रीमती जोशीला पगारीया, सुषमा अहिरे यांचा त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल सत्कार करण्यात आला.

**क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रम दि. 3 जानेवारी 2022**









पुण्यनगरी ३/१/२०२२

## विमलबाई पाटील महाविद्यालय




**साक्री** : येथील त्रिमूर्ती शिक्षण संस्थेचे श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एकक अंतर्गत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.पी.एस. सोनवणे उपस्थित होते. सी.गो.पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर. आर.अहिरे, जिल्हा रासेयो समन्वयक डॉ.सचिन नांद्रे, माजी प्राचार्य बी.एस.पाटील उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.शरद सोनवणे यांनी केले. सूत्रसंचालन व आभार डॉ.दिनेश माळी यांनी मानले.

## सी.गो.पाटील महाविद्यालय



**साक्री** : क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, राष्ट्रपिता महात्मा फुले या महापुरुषांचे विचार सर्वांनी अंगीकृत करून तशी कृती केल्यास ते महापुरुषांना खरे अभिवादन होईल, असे मत डॉ.सतीश म्हस्के यांनी व्यक्त केले. विद्या विकास मंडळाचे सी.गो.पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेंद्र अहिरे होते. यावेळी उपप्राचार्य डॉ.अनंत पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा.डी.पी.पाटील उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ.पंकज अहिरे यांनी केले. सूत्रसंचालन रुचिका चाळसे हिने केले. आभार डॉ .सचिन गोवर्धने यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

जळगाव तरुण भारत
Main Edition | 2022-01-06 | Page- 5
epaper.tarunbharatjalgaon.com

# देसले महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी




**नवापूर, ५ जानेवारी**

साक्री, येथील त्रिमूर्ती शिक्षण संस्थेचे श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एकक अंतर्गत ३ जानेवारी रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे हे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सी.गो.पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर. आर.अहिरे व धुळे जिल्हा रासेयो समन्वयक डॉ.सचिन नांद्रे उपस्थित होते. यावेळी विशेष मार्गदर्शक अतिथी म्हणून माजी प्राचार्य दादासाहेब बी.एस.पाटील यांची उपस्थिती लाभली. प्राचार्य डॉ.आर.आर.अहिरे यांनी यावेळी सावित्रीबाई फुले यांनी मुलींच्या शिक्षणासाठी घेतलेल्या परिश्रमाचा वृत्तांत मांडला. डॉ.सचिन नांद्रे यांनी विद्यार्थिनींनी विकासाच्या विविध क्षेत्रांमध्ये स्वतःचा ठसा उमटवावा असे आवाहन केले.

दादासाहेब बी एस पाटील यांनीही उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सावित्रीबाई फुले यांचे विचार सतत डोळ्यासमोर ठेवून मुलींनी स्वावलंबी बनण्यासाठी कठोर परिश्रमाला तयार राहण्याचे आवाहन केले.

प्राचार्य डॉ. पी एस सोनवणे यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपाच्या भाषणात क्रांतिसूर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे विचार व कार्य आजही सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याचे नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.शरद सोनवणे यांनी केले. तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ.दिनेश माळी यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Powered by iDocuments

## राष्ट्रीय युवा दिवस कार्यक्रम दि.12 जानेवारी 2022



## राष्ट्रीय मतदार दिवस कार्यक्रम / व्याख्यान दि.25 जानेवारी 2022

त्रिमुर्ती शिक्षण संस्थेचे,

### श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व
### कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय,

साक्री जि.धुळे

**राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी कल्याण विभाग,**
**महात्मा गांधी अध्ययन केंद्र आणि निवडणूक साक्षरता मंडळ**

यांच्या संयुक्त विद्यमाने

# राष्ट्रीय मतदार दिन (दि.२५ जानेवारी)

निमित्ताने आयोजित

---

**मतदार जनजागृतीपर विविध स्पर्धा**

---

| | |
|---|---|
| 1. मतदार जनजागृतीपर घोषवाक्य स्पर्धा | दि. 24 जानेवारी 2022 |
| 2. मतदार जनजागृतीपर वक्तृत्व स्पर्धा | दि. 24 जानेवारी 2022 |
| 3. मतदार जनजागृतीपर चित्रकला स्पर्धा | दि. 24 जानेवारी 2022 |
| 4. मतदार जनजागृतीपर निबंध स्पर्धा | दि. 24 जानेवारी 2022 |
| 5. मतदार जनजागृतीपर रांगोळी स्पर्धा | दि. 25 जानेवारी 2022 |

## स्पर्धेचे नियम

1. घोषवाक्य स्पर्धेसाठी 5 घोषवाक्ये स्वतःच्या हस्ताक्षरात लिहलेली असावी.
2. वक्तृत्व स्पर्धेसाठी 5 मिनिटाची ऑडीओ क्लिप तयार करावी.
3. चित्रकला स्पर्धेसाठी कार्ड शीटवर पेंटीग करावी.
4. निबंध स्पर्धेसाठी 300 शब्दमर्यादा असून निबंध स्वतःच्या हस्ताक्षरात असावा.
5. रांगोळी स्पर्धेसाठी घरीच रांगोळी काढून त्यासमक्ष तुमचा फोटो काढुन तो पाठवावा.
6. **स्पर्धेत सहभागाचे फोटो, ऑडीओ क्लिप, पीडीएफ फाईल nssvupsakri@gmail.com या ई.मेल पत्त्यावर अथवा महाविद्यालयाच्या NSS Whatasaap ग्रुपवर पाठवावेत.**
7. **सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येईल.**

---

**आयोजन समिती**

**डॉ.विजय देसले., डॉ.शरद सोनवणे., प्रा.दिनकर पाटील., प्रा.अशोक भदाणे**

**प्रमुख संयोजक**
**प्राचार्य,डॉ.पी.एस.सोनवणे**

जळगाव तरुण भारत
Main Edition | 2022-01-26 | Page- 2
epaper.tarunbharatjalgaon.com

# देसले महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिवस साजरा

**नवापूर :** साक्री येथील श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै. डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयाच्या इतिहास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास विभाग, गांधी तत्वज्ञान केंद्र व निवडणूक साक्षरता मंडळ यांच्या संयुक्त विद्येमाने २५ जानेवारी हा राष्ट्रीय मतदार दिवस ऑनलाईन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून गोपाल पाटील ( नायब तहसीलदार साक्री ), तसेच प्राचार्य बी.एम.भामरे हे उपस्थित होते. या कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. शरद सोनवणे यांनी आपल्या व्याख्यानात सशक्त लोकशाहीच्या



दृढीकरण्यासाठी मतदारांनी संकुचित भूमिकांना व दबावांना बळी न पडता व्यापक राष्ट्रहितास प्राधान्य देऊन निष्पक्षपणे मतदानाचे पवित्र कर्तव्य बजावले पाहिजे, असे प्रतिपादन केले. तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून पसरणाऱ्या फेक न्यूज अर्थात खोट्या आणि दिशाभूल करणाऱ्या माहितीपासून युवा मतदार विद्यार्थ्यांनी सावध राहून त्याची सत्यता पडल्याखेरीज त्यावर विश्वास न ठेवण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच सजग मतदार हाच सदृढ लोकशाहीचा खरा आधार असून मतदारांच्या विवेकी वर्तनावरच भारतीय लोकशाहीचे यश अवलंबून असल्याचा विचार त्यांनी आपल्या व्याख्यानात नमूद केला.

अध्यक्षस्थानी उपस्थित असलेले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवने यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना मतदार यादीत नावनोंदणी करण्यास सांगून नेहमी सचोटीने व स्वतःच्या विवेकबुद्धीने योग्य, प्रामाणिक आणि जनसेवेस कटिबद्ध असणाऱ्या चारित्र्यवान उमेदवारांनाच मतदान करण्यासाठी नेहमी आपला मतदानाचा हक्क बजावला पाहिजे असे सांगितले. सूत्रसंचालन व प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. विजय देसले यांनी केले. तसेच मतदारांसाठी प्रतिज्ञा वाचन विद्यार्थी विकास विभाग प्रमुख प्रा.दिनकर पाटील यांनी केले. जवळजवळ ७० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. त्यापैकी २४ विद्यार्थ्यांनी रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, घोषवाक्य आदींमध्ये सहभाग नोंदविला. आभार प्रदर्शन प्रा. डॉ. विजय देसले यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. हा कार्यक्रम ऑनलाईन व ऑफलाईन या दोन्ही पद्धतीने घेण्यात आला.

Powered by iDocuments

## महात्मा गांधी पुण्यतिथी (हुतात्मा दिन) दि.30 जानेवारी 2022



## आजादी का अमृत महोत्सव निमित्ताने विशेष व्याख्यान दि.5 फेब्रुवारी 2022






## छत्रपती शिवाजी महाराज जयंती कार्यक्रम दि. 19 फेब्रुवारी 2022






तरुण भारत
Main Edition | 2022-02-22 | Page- 2
epaper.tarunbharatjalgaon.com

# साक्री महाविद्यालयात शिवजयंतीनिमित्त विविध कार्यक्रम



**नवापूर : श्री**मती विमल बाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ. भास्कर सदाशिव देसलेविज्ञान महाविद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ता सचिन भामरे यांनी जाणता राजा श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कतृत्व ,नियोजन विषयी सविस्तर असे विवेचन केले. जनतेच्या कल्याणासाठी आदर्श राजा शिवाजी च्या रूपाने श्री छत्रपती शिवाजी महाराज यांनी जेव्हा राज्य निर्माण केले. तेव्हा इतरांच्या मनात तसा विचार सुद्धा येत असे मत मांडून भामरे यांनी आपल्या महाराष्ट्राची थोरवी वर्णन केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस. सोनवणे यांनी देखील श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकताना विविध उदाहरणे दिली. रयतेची कणव असलेला राजा शिवाजी महाराज यांनी गोरगरिबांचा सह स्त्रियांच्या अब्रू संबंधीचा दृष्टीकोन विशाल ठेवलेला होता. शिवाजी महाराज यांनी अंधश्रद्धा निर्मूलन सर्व जाती धर्माचा आदर आयुष्यभर स्वराज्य रक्षणासाठी केलेले अथक प्रयत्न याविषयी माहिती दिली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या दूरदृष्टीचे उदाहरण म्हणून त्यांनी केलेली आरमार उभारणी याविषयी सांगितले. शिवाजी महाराज यांचे विचार व त्यांनी लावलेले धोरण हे आजच्या काळात किती उपयुक्त आहे याविषयी प्राचार्य पी. एस. सोनवणे यांनी विवेचन केले.कार्यक्रमासाठी सर्व प्राध्यापक वृंद प्राध्यापक इतर कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी आकर्षक वेशभूषा करून व जाणता राजा रांगोळी काढून उत्साहाने सहभाग घेतला. तसेच प्रा. कैलास वाघ यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयीच्या पुस्तीकेचे सर्व प्राध्यापक, प्राध्यापक इतर कर्मचारी यांना वाटप केले.

Powered by iDocuments

मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रम दि. 26 फेब्रुवारी 2022






स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्त विशेष व्याख्यान दि.4 मार्च 2022






जळगाव
तरुण भारत
Main Edition | 2022-03-07 | Page- 2
epaper.tarunbharatjalgaon.com

# विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांच्या विकासावर साक्री येथील देसले महाविद्यालयात व्याख्यान




**तभा वृत्तसेवा**
**नवापूर, ६ मार्च**

साक्री येथील श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयात विद्यार्थी विकास विभाग व राष्ट्रीय सेवा योजना मार्फत कबचौ. उमवि जळगाव विद्यार्थी विकास विभागाचे संचालक ॉ. सुनील कुलकर्णी यांनी महाविद्यालयात भेट देली. त्याप्रसंगी त्यांचा सत्कार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी डॉ. सुनील कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांसमोर आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थी विकास विभागामार्फत आपल्या विद्यापीठात ७८ योजना राबवल्या जातात. त्या योजनांचा लेखाजोखा सविस्तरपणे मांडला. त्यात कमवा शिका योजना, आर्थिक दुर्बल घटक, युवारंग, मैत्रीशिबीर, श्रमसंस्कार शिबीर, नाट्यकौशल्य कार्यशाळा, युवतीसभा, युवासंसद कार्यशाळा अशा विविध कार्यशाळेतून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्वाचा विकास घडविण्यास फार मोठी मदत होत असते. असे विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.एस.सोनवणे यांनी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी विद्यार्थी विकास विभाग व राष्ट्रीय सेवा योजना हे अत्यंत महत्त्वपूर्ण विभाग आहेत. या विभागामार्फत विद्यार्थी सुसंस्कृत होतो. त्याच्यामध्ये राष्ट्राबद्दल अभिमान निर्माण होतो. असे त्यांनी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले

सूत्रसंचालन विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. दिनकर पाटील यांनी केले. प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. शरद सोनवणे यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा.डॉ.करूणा अहिरे यांनी मानले. यावेळी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

Powered by iDocuments

7 March 22.pdf

# साक्रीतील देसले महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान संपन्न

**साक्री, दि.६ (प्रतिनिधी)– येथील श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयात विद्यार्थी विकास विभाग व राष्ट्रीय सेवा योजना मार्फत कबचौ. उमवि जळगाव विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ.सुनील कुलकर्णी यांनी महाविद्यालयात भेट देली. त्याप्रसंगी त्यांचा सत्कार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आला.**

यावेळी डॉ.सुनील कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांसमोर मनोगत व्यक्त केले. विद्यार्थी विकास विभागामार्फत आपल्या विद्यापीठात ७८ योजना राबवल्या जातात. त्या योजनांचा लेखाजोखा सविस्तरपणे मांडला. त्यात कमवा शिका योजना, आर्थिक दुर्बल घटक, युवारंग, मैत्रीशिबीर, श्रमसंस्कार शिबीर, नाट्यकौशल्य कार्यशाळा, युवतीसभा, युवासंसद कार्यशाळा अशा विविध कार्यशाळेतून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्वाचा विकास घडविण्यास फार मोठी मदत होत असते, असे विचार व्यक्त केले. सूत्रसंचालन विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.दिनकर पाटील यांनी केले. प्रास्ताविक प्रा.डॉ.शरद सोनवणे यांनी केले. आभार प्रा.डॉ.करूणा अहिरे यांनी मानले. यावेळी सर्व प्राध्यापक व कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## जागतिक महिला दिन दि.8 मार्च 2022






जळगाव तरुण भारत
Main Edition | 2022-03-10 | Page- 2
epaper.tarunbharatjalgaon.com

# साक्री येथील देसले महाविद्यालयात जागतिक महिला दिन साजरा



**नवापूर :** साक्री येथील श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै. डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास विभाग व राष्ट्रीय सेवा योजना एकक अंतर्गत जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून प्रा.सारिका शिंदे यांनी योग अभ्यासाचा मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम या विषयी सांगतांना योगाच्या माध्यमातून व्यक्तीमत्वाचा विकास साधला जातो.

योग म्हणजे निव्वळ व्यायाम आणि आसन नव्हे. हा भावनात्मक समतोल आणि त्या अनादी अनंत तत्वाला स्पर्श करत अध्यात्मिक प्रगतीतील सर्व शक्तत्तांची ओळख करून देणारे शास्त्र आहे, असे सांगितले. अध्यक्षस्थानी उपस्थित असलेले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस. सोनवणे यांनी राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, झाशीची राणी लक्ष्मीबाई यांचा उदाहरणासह दाखला दिला. प्रत्येक महान व्यक्तीच्या जीवनात आणि यशात महिलांचा सिंहाचा वाटा असतो. स्त्री म्हणजे वात्सल्य, स्त्री म्हणजे मांगल्या असे प्रतिपादन प्रा.दिनकर पाटील यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.डॉ.ममता पंजाबी यांनी केले. प्रास्ताविक प्रा.डॉ.वसुमती पाटील यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा.डॉ.करुणा अहिरे (राष्ट्रीय सेवा योजना महिला कार्यक्रम अधिकारी) यांनी केले. यावेळी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

ॲड. तुषार पी.माळी
जाहीर नोटीस
दिवाणी किरकोळ अर्ज नं ३४/२०२२
नि. क ०७
प्रकरण तेरा - नमुना क्र.१ ( परिच्छेद २६०, पृष्ठ ८७)
१९२५ च्या अधिनियम एकोणचाळीस याचे
कलम २८३ याद्वारे आवश्यक असलेल्या

Powered by iDocuments

## शहीद दिन कार्यक्रम दि.23 मार्च 2022











**Principal**
TSS's Smt.V.U.Patil Arts & Late Dr. B.S.Desale
Science College,Sakri Dist-Dhule,424304 (MS)